॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
वीरभूमी
संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***
गुरु म्हणजे ज्ञानाचा सागर,
जो आपल्याला जीवनाची दिशा
दाखवतो.

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १३१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

आडमुठे

अस्थिर सगळेच इथे
स्थिरता शोधता कुठे
सोप्प असत गणित
फक्त धोरण आडमुठे

देवांना नाही चुकले कष्ट
तिथे तुम्ही आम्ही कोण?
परिस्थितीला भिडत
हात करायचे दोन

SPOT NEWS

एनसीएमसीच्या कंत्राटाची चौकशी!

● **मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) एनसीएमसी स्मार्ट कार्ड प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेबाबत प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध होत असलेल्या विविध वृत्तांच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी या संपूर्ण प्रकल्पाचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. प्रकल्पाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत राबविण्यात आलेल्या सर्व प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रियेची माहिती तसेच संबंधित कागदपत्रे तातडीने सादर करण्याचे आदेश त्यांनी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना दिले आहेत. एनसीएमसी स्मार्ट कार्ड प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत, निविदा प्रक्रियेबाबत तसेच संबंधित कंत्राटदार कंपनीच्या निवडीबाबत प्रसार माध्यमांमधून विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया नेमकी कोणत्या पद्धतीने राबविण्यात आली, त्यासाठी कोणते प्रशासकीय व तांत्रिक निकष निश्चित करण्यात आले होते, निविदा प्रसिद्धीपासून अंतिम कंत्राट मंजुरीपर्यंत कोणकोणते टप्पे पार पडले आणि संबंधित कंपनीची निवड कोणत्या आधारावर करण्यात आली, याची वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

कांद्याच्या दरात पुन्हा घसरण!

● **लासलगाव** – येथील कृषि उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या दरातील चढ-उतार सुरूच असून, सोमवारी लाल कांद्याला मिळालेल्या ५,०३१ रुपये प्रतिक्विंटलच्या कमाल दरात मंगळवारी २५० रुपयांची घसरण झाली. मंगळवारी लाल कांद्याला ४,७८१ रुपये प्रतिक्विंटल कमाल भाव मिळाला. लाल कांद्याच्या आवकेत वाढ झाल्याने दरावर दबाव निर्माण झाला असून, दुसरीकडे उन्हाळ कांद्याची आवक मंदावल्याचे बाजार समितीत दिसून आले. राजस्थान, महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक या कांदा उत्पादक राज्यांमधून नवीन खरीप कांद्याची आवक वाढत असल्याने घाऊक बाजारातील दर नरमल्याचे केंद्र सरकारचे निरीक्षण आहे.

शेतकऱ्यांना पुढील तीन महिने मोफत धान्य

राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय । प्रतिव्यक्ती ३ किलो तांदूळ आणि २ किलो गहू मिळणार

● **मुंबई । वीरभूमी** –

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यामध्ये राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या निर्णयाचा समावेश आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील दारिद्र्यरेषेखालील आणि डीबीटी योजनेत समाविष्ट नसलेल्या राज्यातील ३३ जिल्ह्यांमधील ४२ लाख ३० हजार ७८३ शेतकऱ्यांना पुढील तीन महिने मोफत धान्य वितरित करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला एकूण पाच किलो धान्य मिळणार असून, त्यात ३ किलो तांदूळ आणि २ किलो गव्हाचा समावेश आहे. या निर्णयामुळे ४२ लाखांहून अधिक शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.

मंत्रिमंडळाचे अन्य महत्त्वपूर्ण निर्णय

नर्मदा-तापी वळण योजनेसाठी ५,५४८ कोटींची तरतूद

नंदुरबार जिल्ह्यातील नर्मदा-तापी वळण योजनेसाठी ५ हजार ५४८ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. या योजनेअंतर्गत सहा वळण बंधाऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे परिसरातील सुमारे २६ हजार ५२६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार असून, ११.५० मेगावॅट वीज निर्मितीही होणार आहे.

आर्थिक फसवणूक करणाऱ्या संस्थांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रिया वेगवान

आर्थिक फसवणूक करणाऱ्या संस्थांच्या मालमत्ता जप्तीची प्रक्रिया जलद करण्यासाठी स्वतंत्र एमपीआयडी न्यायाधिकरण स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच संबंधित प्रकरणांचा ९० दिवसांच्या आत निपटारा करण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय



संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियमात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली.

महसूल न्यायालयीन कामकाजासाठी नवीन प्रणाली

महसूल विभागातील अर्धन्यायिक कामकाजासाठी महसूल न्यायालय दावा व्यवस्थापन प्रणाली (रेव्हेन्यू कोर्ट केस मॅनेजमेंट सिस्टीम) लागू करण्यात येणार आहे. तसेच प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी 'एक जिल्हा, एक अपील' ही तरतूद लागू होणार आहे. यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना वाढीव निर्वाह भत्ता

आरोग्य विज्ञान व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल (ईबीसी, एसईबीसी, ईडब्ल्यूएस) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत सुधारित दराने भत्ता मिळणार आहे. यामध्ये भोजन, निवास आणि निर्वाह भत्त्यात भरीव वाढ करण्यात येणार आहे.

शिक्षक-कर्मचाऱ्यांसाठी आर्थिक सक्षमीकरण सुविधा

शालार्थ प्रणालीत समाविष्ट असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बिगर बँकिंग वित्तीय संस्थांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रिझर्व्ह बँकेकडे (आरबीआय) नोंदणीकृत संस्थांमार्फत ही वित्तीय सुविधा दिली जाणार आहे.

मुद्रांक शुल्कविषयक तरतुदींमध्ये सुधारणा

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ३२ (ब) आणि ५३ (१अ) मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. यासंदर्भातील विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे. या सुधारणेमुळे अभिनिर्णय आणि अपील यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या दरांमध्ये सुसूत्रता येणार आहे.

दोन विद्यापीठांच्या अधिनियमांत सुधारणा

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक अधिनियम, १९९७ आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अधिनियम, १९८९ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. कुलसचिव नियुक्ती, परिनियम, वित्त व लेखा समिती, इमारत बांधकाम समिती, वार्षिक अहवाल आणि लेखे यांसंदर्भातील परिभाषांमध्ये एकसमानता आणण्यासाठी या सुधारणा करण्यात येणार आहेत.

खासगी अनुदानित शाळांसाठी स्वतंत्र कायदा

खासगी अनुदानित शाळांच्या विनियमनासाठी सर्वसमावेशक कायदा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी 'महाराष्ट्र खासगी अनुदानित शाळा (विनियमन) विधेयक, २०२६' या विधेयकाच्या प्रारूपास मंजुरी देण्यात आली. हे विधेयक विधिमंडळात सादर करण्यात येणार आहे.

माथाडी आणि सुरक्षा रक्षक कामगार कायद्यांत सुधारणा

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ आणि महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ या दोन्ही कायद्यांमध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती एनसीएएचपी कायद्यातून वगळणार

राष्ट्रीय सहयोगी आणि आरोग्यसेवा व्यवसाय आयोग अधिनियम, २०२१ (एनसीएएचपी कायदा, २०२१) मधून ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती वगळण्यात येणार आहे. यासंदर्भातील आवश्यक सुधारणा करणाऱ्या विधेयकाच्या प्रारूपास मंजुरी देण्यात आली.

खासगी अनुदानित आयुर्वेद, युनानी महाविद्यालयांतील ग्रंथपालांना सातवा वेतन आयोग

शासकीय वैद्यकीय, दंत आणि आयुर्वेद महाविद्यालयांतील पूर्णवेळ ग्रंथपालांप्रमाणेच आता खासगी अनुदानित आयुर्वेद आणि खासगी अनुदानित युनानी महाविद्यालयांतील ग्रंथपालांनाही सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार वेतन देण्यास मान्यता देण्यात आली.

लोकसेवा हक्क अधिनियमात सुधारणा

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. यासंदर्भातील सुधारणा अधिनियम विधिमंडळासमोर मांडण्यात येणार आहे.

मौदा नगरपंचायतीला शासकीय जमीन

नागपूर जिल्ह्यातील मौदा नगरपंचायतीला शासकीय जमीन देण्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा मार्ग मोकळा झाला आहे.

पुण्यात न्यायालयाच्या आवारातच गोळीबार, कोयत्याने सपासप वार; तरुण गंभीर जखमी

● **पुणे । वीरभूमी** –

शिवाजीनगर न्यायालयाच्या गेट नंबर ४ बाहेर बुधवारी भरदुपारी ६ जणांच्या टोळक्याने मंदार किवळे (३५) या तरुणावर गोळीबार आणि कोयत्याने सपासप वार करून जीवघेणा हल्ला केला. थेट कोर्टाच्या आवारातच भर गर्दीत हा प्रकार घडल्याने खळबळ उडाली असून, पुण्यासह राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, भीषण हल्ल्याच्या घटनेनंतर पुणे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या काही तासांत ५ आरोपींना ताब्यात घेतले. या संपूर्ण हल्ल्याचा कट रचणा-या अक्षय चव्हाण आणि अमोल चव्हाण या दोघांना पुण्यातून अटक करण्यात आली असून, थेट हल्ल्यात सहभागी असलेल्या आणखी ३ आरोपींना पुणे गुन्हे शाखेने दौंडमधून बेड्या ठोकल्या आहेत.

शिवाजीनगर कोर्ट परिसरात फायरिंग आणि कोयत्याने वार केल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला होता. हे आरोपी आधी दौंडच्या दिशेने आणि त्यानंतर सोलापूरच्या दिशेने निघाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पुणे पोलिसांनी तात्काळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून तांत्रिक तपास सुरू केला. आरोपी ज्या मार्गाने पुढे गेले, त्या मार्गावरील सर्व पोलिस ठाण्यांना सतर्कतेचा इशारा देत माहिती पोहोचवण्यात आली. तसेच त्या मार्गावरील सर्व चेक पॉईंट्सवर पुणे पोलिसांची क्राईम ब्रँच तैनात करण्यात आली होती. नाकाबंदी आणि क्राईम ब्रँचच्या पथकाने केलेल्या कारवाईत ३ हल्लेखोर दौंडमधून ताब्यात घेण्यात आले असून आता त्यांना पुढील सखोल चौकशीसाठी पुण्यात आणण्यात आले.

टाटा मोटर्सच्या जमशेदपूर प्लांटचे उत्पादन बंद !

आंदोलनामुळे ५,००० कामगार माघारी परतले

● **जमशेदपूर । वीरभूमी** –

टाटा मोटर्सच्या जमशेदपूर येथील प्लांटमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाने बुधवारी सकाळी अत्यंत उग्र रूप धारण केले. आंदोलकांनी प्लांटचे सर्व प्रवेशद्वार पूर्णपणे रोखून धरल्याने 'ए' आणि 'जनरल' शिफ्टमधील एकाही कामगार किंवा अधिकाऱ्याला कंपनीत प्रवेश मिळाला नाही. परिणामी, सुमारे ५,००० कामगार आणि अधिकाऱ्यांना कामावर न जाताच घरी परतावे लागले. या कोंडीमुळे कंपनीच्या उत्पादनाला मोठा फटका बसला असून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

टाटा मोटर्सच्या इंजिन डिव्हिजनमध्ये कार्यरत असलेले कर्मचारी सुबोध पात्रो हे काही दिवसांपूर्वी कंपनीतील एका अपघातात जखमी झाले होते. सुबोध यांचे पुत्र सहदेव पात्रो यांनी आरोप केला आहे की, कंपनी व्यवस्थापनाने हा अपघात 'इंज्युरी ऑन ड्युटी' म्हणून नोंदवला नाही आणि केवळ प्राथमिक उपचार करून त्यांना घरी पाठवून दिले. घरी गेल्यानंतर त्यांची प्रकृती अधिकच खालावली आणि शनिवारी रात्री १० वाजता टाटा मोटर्स रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संतप्त झालेल्या नातेवाईकांनी आणि कामगार नेते बंटी सिंह यांनी रविवारपासून कंपनीच्या मुख्य गेटवर ठिय्या आंदोलन सुरू केले.

रविवारपासून मुख्य गेट बंद असल्याने कर्मचारी आणि अधिकारी शेजारील 'टेल्कोन' कंपनीच्या आणि कॅन्टीनच्या गेटमधून पायी ये-जा करत होते. मात्र, बुधवारी सकाळी आंदोलकांनी हे सर्व पर्यायी गेटही बंद केले. पहाटे ४ वाजता घराबाहेर पडून कंपनीच्या बसने गेटवर पोहोचलेल्या कामगारांना आणि जनरल शिफ्टच्या अधिकाऱ्यांना प्रवेश नाकारण्यात आला.

सौदी अरेबियाच्या तेल रिफायनरीवर हुथींचा क्षेपणास्त्र हल्ला

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ

● **रियाध । वीरभूमी** –

येमेनमधील हुथी बंडखोरांनी बुधवारी सौदी अरेबियातील सर्वात मोठ्या रास तनुरा तेल शुद्धीकरण प्रकल्पावर क्षेपणास्त्र हल्ला केला. या हल्ल्यात प्रकल्पाचे मोठे नुकसान झाल्याचा दावा करण्यात येत आहे. नासाच्या उपग्रहाने टिपलेल्या छायाचित्रांमधून रिफायनरीच्या परिसरातील सुमारे ६०० चौरस किलोमीटरच्या आकाशात दाट काळ्या धुराचे लोट पसरल्याचे दिसून आले आहे.हुथींच्या या हल्ल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली असून, तेलाचे दर प्रति बॅरल ८२ डॉलरच्या पुढे गेले आहेत.

हुथी बंडखोरांनी सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथील आर्थिक जिल्ह्याला पुन्हा लक्ष्य केल्याचाही दावा केला आहे.दरम्यान, येमेनमधील संघर्ष सौदी अरेबियाच्या पाठिंब्याने सत्तेवर असलेल्या सरकारची राजधानी अदनच्या आणखी जवळ पोहोचला आहे. जमिनीवरील लढाईत सरकारी सैन्याला मागे ढकलत हुथी बंडखोर अदनच्या दिशेने आगेकूच करत आहेत.

हुथी बंडखोरांनी ज्या रास तनुरा तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला केला, तो सौदी अरेबियाच्या समुद्रकिना-याजवळ आहे. या प्रकल्पात उत्पादित होणा-या तेलाचा बहुतांश भाग निर्यात केला जातो. या रिफायनरीची दररोज साडेपाच लाख बॅरल कच्च्या तेलावर प्रक्रिया करण्याची क्षमता आहे. हुथींच्या लष्करी शाखेचे प्रवक्ते याह्या सारी यांनी सांगितले की, या हल्ल्यात रिफायनरीचे मोठे नुकसान झाले असून तेथे आग लागली आहे. मात्र, सौदी अरेबियाच्या हवाई संरक्षण यंत्रणेच्या प्रवक्त्याने रास तनुरा परिसरातील आकाशात हुथींचे चार हल्लेखोर ड्रोन पाडण्यात आल्याचे सांगितले. मात्र, रिफायनरीवर झालेल्या हल्ल्याबाबत त्यांनी कोणतीही माहिती दिली नाही.

जगातील सर्वात मोठी तेल कंपनी असलेल्या आणि या रिफायनरीचे संचालन करणाऱ्या अरामकोनेही या हल्ल्याबाबत अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर लाल समुद्रातून होणाऱ्या सौदी अरेबियाच्या तेल



निर्यातीवर हुथींनी घातलेली बंदी आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतुकीत निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे तेल निर्यातीसमोर निर्माण झालेल्या परिस्थितीवर २९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ओपेक प्लसच्या बैठकीत चर्चा होणार आहे.

वीरभूमी

SPOT NEWS

प्रिंटिंग प्रेसमधील कामगार ते राज्यकर अधिकारी; अर्जुन दारकुंडे यांचा संघर्ष प्रेरणादायी!

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

आर्थिक परिस्थितीवर मात करत प्रिंटिंग प्रेसमध्ये कामगार म्हणून सुरुवात केलेल्या अर्जुन दशरथ दारकुंडे यांनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर राज्यकर अधिकारीपदापर्यंत मजल मारली. त्यांचा संघर्षमय प्रवास विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, विद्यार्थ्यांनीही आई-वडिलांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर ध्येय गाठावे, असे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांनी केले. निंबळक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राज्यकर अधिकारीपदी पदोन्नती झाल्याबद्दल अर्जुन दारकुंडे आणि त्यांच्या पत्नी रोहिणी दारकुंडे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. दिलीप पवार अध्यक्षस्थानी होते. माजी उपसरपंच घनश्याम म्हस्के यांनी दारकुंडे यांच्या संघर्षाचा आढावा घेतला. आगडगावसारख्या डोंगराळ भागातून प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पुण्यात उच्च शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी हॉटेलमध्ये काम केले. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण आणि ध्येय यांची सांगड घालत त्यांनी अधिकारीपदापर्यंत मजल मारल्याचे त्यांनी सांगितले. मुख्याध्यापक एम. बी. कोल्हे यांनी प्रास्ताविकात दारकुंडे यांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक केले. त्यांच्या पत्नी रोहिणी या याच शाळेच्या माजी विद्यार्थिनी असून, त्यांनी शाळेत दोन वर्षे रेमेडियल एज्युकेटर म्हणूनही काम केले आहे. सत्काराला उत्तर देताना रोहिणी दारकुंडे यांनी अर्जुन यांच्या संघर्षमय प्रवासातील आठवणी सांगितल्या. शिक्षणासाठी त्यांनी प्रिंटिंग प्रेसमध्ये काम केले, बी.एस्सी.च्या शिक्षणादरम्यान तहसील कार्यालयात अर्धवेळ नोकरी केली, तर पुण्यात उच्च शिक्षण घेताना महाविद्यालयाच्या मेसमध्ये वेटर म्हणून काम केले. २०१७ मध्ये त्यांची जीएसटी विभागात टॅक्स असिस्टंट म्हणून नियुक्ती झाली. २०१८ मध्ये विवाह झाल्यानंतरही त्यांनी अभ्यास सुरू ठेवला. कार्यालयीन कामकाजासोबत नियमित अभ्यास करून त्यांनी राज्यकर अधिकारीपदापर्यंत मजल मारली, असे त्यांनी सांगितले. यावेळी ग्रामसेवक रासकर, ग्रामपंचायत प्रशासक आंबेडकर, बी. डी. कोतकर, महेश म्हस्के, दत्ता धावडे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक रघुनाथ झावरे यांनी केले, तर सूत्रसंचालन सुरेश कार्ले यांनी केले.

योगसेवक रामचंद्र लोखंडे यांना डॉ. राजेंद्र प्रसाद राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

योग आणि ध्यानधारणेच्या माध्यमातून समाजामध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करण्याबरोबरच व्यसनमुक्त पिढी घडविण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले भिंगार, अहिल्यानगर येथील योगसेवक रामचंद्र बाबुराव लोखंडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व योगसेवेबद्दल डॉ. राजेंद्र प्रसाद राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जळगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जळगाव येथील कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते रामचंद्र लोखंडे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या दीर्घकालीन योगसेवेचे आणि सामाजिक योगदानाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

'शेतकऱ्यांच्या घामाला ३७०० रुपयांचा दाम!'

ओंकार ग्रुपची ऊसदरात आघाडी । गौरी व ओंकार शुगरची घोषणा

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेत ओंकार ग्रुपच्या हिरडगाव येथील गौरी शुगर अँड डिस्टीलरीज प्रा. लि. आणि देवदैठण येथील ओंकार शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज प्रा. लि. या दोन्ही साखर कारखान्यांनी चालू गळीत हंगामासाठी प्रतिमेट्रिक टन ३७०० रुपये ऊसदर जाहीर केला आहे. ओंकार ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे-पाटील यांनी ही घोषणा केली. या निर्णयामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, जिल्ह्यातील ऊसदराच्या चर्चेला नवी दिशा मिळाली आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील ऊसदराच्या कोंडीला ओंकार ग्रुपने पहिली वाट करून दिल्याची चर्चा शेतकरी वर्गातून होत आहे.

ओंकार ग्रुपने स्थापनेपासूनच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित केंद्रस्थानी ठेवून आपली वाटचाल केली आहे. शेतकऱ्यांच्या घामाला आणि कष्टाला योग्य मोबदला मिळावा, त्यांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लागावा आणि शेती व्यवसाय अधिक सक्षम व्हावा, या भूमिकेतून ग्रुपने नेहमीच शेतकरीहिताचे निर्णय घेण्याला प्राधान्य दिले आहे. याच धोरणाचा प्रत्यय चालू गळीत हंगामातील ३७०० रुपये प्रतिमेट्रिक टन या ऊसदराच्या घोषणेतून आला आहे.



ऊसदर जाहीर करताना अध्यक्ष बाबुराव बोत्रे-पाटील म्हणाले, ओंकार ग्रुप ऊसदराच्या बाबतीत कधीही मागे राहिलेला नाही आणि भविष्यातही राहणार नाही. शेतकऱ्यांचा स्वाभिमान जपणे, त्यांच्या कष्टाचा सन्मान करणे आणि त्यांची आर्थिक उन्नती साधणे, हाच ओंकार ग्रुपच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश आहे. शेतकरी हा साखर उद्योगाचा केंद्रबिंदू असून, त्याच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणे ही आमची भूमिका आहे.

ते पुढे म्हणाले, सध्या विविध जिल्ह्यांमध्ये ओंकार ग्रुपचे साखर कारखाने यशस्वीपणे सुरू आहेत. चालू हंगामात हिरडगाव येथील गौरी शुगर आणि देवदैठण येथील ओंकार शुगर या दोन्ही कारखान्यांच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिमेट्रिक टन ३७०० रुपये दर देण्याचा निर्णय घेतला आहे. वर्षभर शेतात राबून, ऊन-पावसाची तमा न बाळगता ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य किंमत मिळाली पाहिजे. शेतकऱ्यांना केवळ आश्वासने न देता त्यांच्या हिताचे ठोस निर्णय घेणे, हीच आमची कार्यपद्धती आहे.

शेतकरी कुटुंबातून आलेले नेतृत्व असल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी, शेतीतील अनिश्चितता, उत्पादन खर्च आणि त्यांच्या कष्टांची आम्हाला जाणीव आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे निर्णय घेण्यासाठी ओंकार ग्रुप भविष्यातही कटिबद्ध राहील, अशी ग्वाही बोत्रे-पाटील यांनी दिली.

सध्या एकीकडे वाढता शेती उत्पादन खर्च, मजुरी, खते, औषधे आणि सिंचनाचा खर्च यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक नियोजनाच्या चिंतेत असताना ओंकार ग्रुपने जाहीर केलेला ३७०० रुपयांचा दर महत्त्वपूर्ण मानला जात आहे. दोन्ही कारखान्यांच्या या निर्णयामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, इतर साखर कारखाने ऊसदराच्या बाबतीत काय भूमिका घेतात, याकडेही आता शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

आमदार किशोर दराडे यांच्याकडून अगस्ती विद्यालयास प्रोजेक्टर भेट



● **अकोले । वीरभूमी–**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी आणि अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक प्रभावी व रंजक व्हावी, या उद्देशाने आमदार किशोर दराडे यांनी अगस्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अकोले यांना प्रोजेक्टर भेट दिला.

आजच्या डिजिटल युगात शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध विषयांतील संकल्पना चित्रफिती, सादरीकरणे आणि दृकश्राव्य माध्यमातून समजून घेणे अधिक सोपे होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे.

या शैक्षणिक सुविधेबद्दल विद्यालयाच्या वतीने आमदार किशोर दराडे यांचे आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या या सहकार्यामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीस निश्चितच हातभार लागणार आहे.

याप्रसंगी संस्थेचे कार्यवाहक शिरीष नाईकवाडी ,सतीश नाईकवाडी योगी केशवबाबा चौधरी, विधिज्ञ् वसंतराव मनकर सुनिल धुमाळ विजयराव पोखरकर हेमंत आवारी मुख्याध्यापक संजय शिंदे उपमुख्याध्यापक संदीप दारोळे पर्यवेक्षक विजय नाईकवाडी तसेच विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

श्रीगोंद्यातील ३६३ शाळा मूलभूत सुविधांपासून वंचित!

५१ शाळांत पिण्याचे पाणी नाही, ५० शाळांना शौचालयाचा अभाव

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

तालुक्यातील ३६३ शाळांमधील विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधा आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार, ५१ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही, तर ५० शाळांमध्ये शौचालय उपलब्ध नाही. याशिवाय २५५ शाळांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शौचालय नसल्याचे समोर आले आहे. या गंभीर प्रश्नांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कॉंकरोच जनता पार्टीने केला आहे.



यासंदर्भात पक्षाच्या वतीने ३ सप्टेंबर २०२६ रोजी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देऊन १५ दिवसांत आवश्यक कामे पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, दोन महिने उलटूनही अनेक शाळांमधील समस्या कायम असल्याने कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ६६ शाळांमध्ये वीजजोडणी नसून अनेक शाळांना संरक्षण भिंतीचाही अभाव आहे. काही ठिकाणी शाळांच्या इमारतींची दुरवस्था असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, शौचालय आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर शिक्षण व्यवस्थेचा नेमका उपयोग काय? असा सवाल उपस्थित करत प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पक्षाने केली आहे.

केवळ निवेदने देऊन प्रश्न सुटत नसल्याने आता आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा कॉंकरोच जनता पार्टीने दिला आहे. शाळांमधील प्रलंबित कामे तातडीने सुरू न केल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल. त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीला संबंधित अधिकारी जबाबदार राहतील, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी ॲड. राजेंद्र नागवडे, सुशीलकुमार शेळके, प्रथमेश दरवडे, मनोज लगड, सुशांत भंडारे, गणेश लाटे, अक्षय काळे आदी उपस्थित होते.

भगवानगडाचे द्वितीय महंत संत भीमसिंह बाबांची पुण्यतिथी भक्तिभावात साजरी

न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री व महंत कृष्णा महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक कार्यक्रम । कीर्तनातून संत भीमसिंह महाराजांच्या कार्याला उजाळा

● **पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील श्रीक्षेत्र भगवानगड येथे भगवानगडाचे द्वितीय महंत वैकुंठवासी गुरुवर्य संत भीमसिंह बाबांची पुण्यतिथी मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली. न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री आणि भगवानगडाचे चतुर्थ महंत ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यानिमित्त ह.भ.प. बाबासाहेब महाराज बडे (केशवराज संस्थान, वारणी) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते.

कीर्तनासाठी महाराजांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा 'धन्य मी मानीन आपुले संचित' हा अभंग घेतला. त्याच्या निरूपणातून त्यांनी गुरुवर्य संत भीमसिंह बाबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेत भगवानगडाचे स्थान अत्यंत श्रद्धेचे आणि आदराचे आहे. संत भगवानबाबांनी आयुष्यभर वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार, उपेक्षित-वंचित समाजाचा उद्धार आणि माणुसकीच्या धर्माची स्थापना यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या पश्चात ही परंपरा, विचार आणि कार्य पुढे नेण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी महंत भीमसिंह महाराज भगवानगडकर यांनी समर्थपणे सांभाळली.

ह.भ.प. बंकटस्वामी यांचे पुतणे आणि भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी असलेले महंत भीमसिंह महाराज हे ख्यातनाम गायक, मृदंगाचार्य आणि रसाळ वाणीचे नामवंत कीर्तनकार होते. पैठण येथील संतपीठाचे प्रथम कुलगुरू म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संगीत, कीर्तन, संतविचार आणि वारकरी संप्रदायावरील निष्ठा यांचा सुंदर संगम होता.

महंत भीमसिंह महाराजांचा जन्म वारकरी संस्कारांच्या वातावरणात झाला. घरातील भजन, कीर्तन, हरिनाम आणि संतविचारांच्या परंपरेत त्यांचे बालपण घडले. ह.भ.प. बंकटस्वामी यांच्या सहवासातून त्यांना लहानपणापासूनच वारकरी संप्रदायाचे बाळकडू मिळाले.

संत भगवानबाबांनंतर भगवानगडाची गादी सांभाळणे म्हणजे केवळ पद किंवा प्रतिष्ठा नव्हे, तर लाखो वारकऱ्यांची श्रद्धा, अपेक्षा, गडाचा विकास आणि संप्रदायाचा प्रचार-प्रसार यांची मोठी जबाबदारी होती. महंत भीमसिंह महाराज यांनी ही जबाबदारी निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडली. भगवानगडाला केवळ धार्मिक स्थळ न ठेवता लोकशिक्षण, संस्कार आणि समाजप्रबोधनाचे केंद्र बनविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि संत एकनाथ यांच्या अभंगांचे ते अत्यंत सोप्या, रसाळ आणि लोकभाषेतील शैलीत निरूपण करीत असत. महंतपद आणि गादीचे उत्तराधिकारी असूनही त्यांच्या वागण्यात कधीही अहंकार नव्हता. इतरांच्या कीर्तनात स्वतः टाळ घेऊन उभे राहणारे निष्ठावंत वारकरी म्हणून त्यांची विशेष ओळख होती. या कृतीतून त्यांनी आपणही वारकरी संप्रदायाचे सेवक आहोत, हा आदर्श घालून दिला. नम्रता हाच संतांचा खरा दागिना आहे, हे त्यांनी आपल्या आचरणातून दाखवून दिले. त्यांच्या या वृत्तीने अनेक तरुण कीर्तनकार आणि वारकऱ्यांना प्रेरणा मिळाली.

संत भगवानबाबांचे विचार आणि कार्य खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचविण्यासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले. समता, माणुसकी, अंधश्रद्धा निर्मूलन आणि शिक्षणाचा संदेश केवळ भगवानगडापुरता मर्यादित न राहता प्रत्येक गावात आणि प्रत्येक घरात पोहोचावा, यासाठी त्यांनी कार्य केले.

पैठण येथील संतपीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून त्यांची निवड होणे ही त्यांच्या विद्वत्तेची, अनुभवाची आणि वारकरी संप्रदायावरील निष्ठेची पावती होती. संतपीठाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचे विचार, संतसाहित्य, कीर्तन परंपरा आणि गायन-वादन यांचे शिक्षण दिले जाते. या संस्थेचे प्रथम कुलगुरू म्हणून त्यांनी संतपीठाला शिस्त, दिशा आणि संस्कारांची जोड दिली. विद्यार्थ्यांना केवळ कीर्तन करण्याचे तंत्रच नव्हे, तर कीर्तनकार म्हणून कसे जगावे, याचेही मार्गदर्शन केले.

महंत भीमसिंह महाराज यांच्या जीवनकार्याचा विचार केला असता, पदाचा अहंकार न बाळगता नम्रतेने समाजसेवा करणे, संतांचे विचार आचरणात आणणे आणि माणुसकीचा धर्म जपणे हा संदेश मिळतो. संतविचारांचा प्रसार आणि वारकरी परंपरेचे जतन हेच त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचे खरे माध्यम ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



कीर्तनसेवेनंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. मोठ्या संख्येने भाविकांनी या पुण्यतिथी सोहळ्यात सहभागी होऊन संत भीमसिंह बाबांना अभिवादन केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

नगरसेवक मनोज कोतकर यांच्या पाठपुराव्याने आदर्शनगरच्या रखडलेल्या रस्त्याचा प्रश्न मार्गी

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

केडगाव येथील आदर्शनगर परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. नगरसेवक मनोज कोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या निधीतून रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे. प्रभाग क्रमांक १७ मध्ये विकासकामांना गती मिळाली असून, आदर्शनगरमधील या रस्त्याचे सुरुवातीला खडीकरण करण्यात आले होते. आता डांबरीकरणाचे काम सुरू झाले आहे. उर्वरित प्रलंबित विकासकामेही टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील, अशी ग्वाही नगरसेवक मनोज कोतकर यांनी दिली. तसेच दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता नागरिकांनी नळांना तोट्या बसवून पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. नगरसेवक मयूर बांगरे यांनी प्रभागातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे आपले प्राधान्य असल्याचे सांगितले. मनोज कोतकर यांच्या पाठपुराव्यामुळे आणि आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या निधीतून रस्त्याचे काम सुरू झाल्याचे त्यांनी नमूद केले. प्रभागाचा समतोल विकास करण्यासाठी सर्व नगरसेवक एकजुटीने प्रयत्नशील राहतील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी नगरसेवक मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, उद्योजक जालिंदर कोतकर, उद्योजक सुमित लोंढे, पोपट नाटक, अशोक जोशी, रोहिदास मुसळे, प्रल्हाद शिंदे, कौशल्य फुंदे, लहानु चेमटे, मुक्ता घोंगडे, शरीफ शेख, मीराबाई गोरे, प्रशांत वाडकर, गणेश नागरगोजे, योगेश गोरे आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

क्लेरा ब्रूस हायस्कूल आणि अहमदनगर बोर्डिंग हायस्कूलच्या पुनरुज्जीवनाची मागणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याशी संबंधित ऐतिहासिक वारसा लाभलेल्या क्लेरा ब्रूस हायस्कूल फॉर गर्ल्स आणि अहमदनगर बोर्डिंग हायस्कूल या दोन शाळा बंद करण्याच्या प्रक्रियेला स्थगिती देऊन त्यांचे पुनरुज्जीवन करावे, अशी मागणी 'मिस् सिंथिया फॅरार शाळा बचाव अभियान'च्या वतीने करण्यात आली. महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर या शाळांचे 'हेरिटेज बेस्ड मॉडेल स्कूल'मध्ये रूपांतर करावे, अशी मागणीही करण्यात आली. बुधवारी (ता. २५ नोव्हेंबर) जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड आणि मराठी मिशनच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. अमेरिकन मराठी मिशनने १८२८ मध्ये महाराष्ट्रात शैक्षणिक कार्य सुरू केले. १८३८ मध्ये मुलींसाठी शाळा स्थापन करण्यात आली. मिस् सिंथिया फॅरार यांनी स्त्रीशिक्षणाच्या प्रसारात महत्त्वपूर्ण योगदान दिले, तर १८८२ मध्ये अहमदनगर बोर्डिंग हायस्कूलची स्थापना झाली. या दोन्ही शाळांना महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात विशेष महत्त्व आहे. शिक्षकांची कमतरता, वेतनाचे प्रश्न, विद्यार्थिसंख्येतील घट आणि सुविधांचा अभाव यामुळे शाळांची अवस्था खालावल्याचे अभियानाने म्हटले आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवाविषयक कागदपत्रे तपासून प्रलंबित वेतन-भत्ते द्यावेत आणि आवश्यक शिक्षक उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. यावेळी रेव्ह. जी.आर. वाघमारे, संध्या मेढे, रफिक मुन्शी, भैरवनाथ वाकळे, इंजि. अभिजीत एकनाथ वाघ, आसिफखान दूलेखान, जफर खान, अजय सूर्यवंशी, डी.डी. सोनवणे, राजू देठे, सुनील बनसोडे, फिरोज शेख, विशाल केदारे, दीपाली कांबळे, स्मिता नाईक, विजय काकडे, अर्पा साळवे, सीमा जाधव, राणी पातारे, किरण कटारिया, पंकज गुंदेचा, डॉ. महेश पाटोळे, विजय कर्डक, सॅम नाईक, अनिल नेटके, राहुल वैराळ यांच्यासह एज्रा फाउंडेशनचे सेवक, माजी विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कामगार कल्याण मंडळाच्या नाशिक विभागाअंतर्गत १४१३९ लाभार्थ्यांना ५ कोटी ५८ लाख रुपयांची आर्थिक मदत

नाशिक विभागाच्या सहाय्यक कल्याण आयुक्त श्रीमती भावना बच्छाव यांची माहिती

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नाशिक विभागाअंतर्गत नाशिक अहिल्यानगर, धुळे, जळगाव, नंदुरबार या पाच जिल्ह्यातील १४१३९ लाभार्थ्यांना २०२४-२५ व २०२५-२६ या दोन आर्थिक वर्षात ५ कोटी ५८ लाख ११ हजार ७९८ रुपयांची आर्थिक मदत देण्यात आल्याची माहिती नाशिक विभागाच्या सहाय्यक कल्याण आयुक्त श्रीमती भावना बच्छाव यांनी दिली.

अधिक माहिती देतांना श्रीमती बच्छाव पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती. आय. ए. कुंदन (आयएस) व कामगार तथा कामगार कल्याण मंडळाच्या उपसचिव रोशनी कदम पाटील, आयुक्त नंदलाल राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक प्रादेशिक विभागांतर्गत येणाऱ्या नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे व नंदुरबार या ५ जिल्ह्यांमधील नोंदणीकृत कामगारांच्या कुटुंबातील घटकांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळा मार्फत विविध कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जातो.

या कल्याणकारी योजनांमुळे कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

नाशिक विभागांतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ७१६५ लाभार्थ्यांना ३ कोटी १ लाख ५९ हजार ७४४ रुपयांची तर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण ६९७४ लाभार्थ्यांना २ कोटी ५६ लाख ५२ हजार ५४ रुपयांच्या निधीचे वितरण थेट त्यांच्या बँक खात्यात (डीबीटी द्वारे) करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील लाभार्थी संख्या व त्यांना योजनांनुसार मिळालेली आर्थिक मदत पुढील प्रमाणे : गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजना ४४९ लाभार्थी (८६ लाख ७५ हजार रुपये), सर्वसाधारण शैक्षणिक अर्थसहाय्य योजना ५६४१ लाभार्थी (१ कोटी ७४ लाख ९४ हजार रुपये), क्रीडा अर्थसहाय्य योजना ९ लाभार्थी (४६ हजार रुपये), परदेश शैक्षणिक अर्थसहाय्य योजना ३८ लाभार्थी (१९ लाख रुपये), पाठ्यपुस्तक अर्थसहाय्य योजना ४६८ लाभार्थी (६ लाख ३८ हजार ३५९ रुपये), एम.एस.सी.आय.टी. सहाय्यता योजना ५०३ लाभार्थी (११ लाख ७४ हजार ७५ रुपये), शिवणयंत्र अनुदान योजना १४ लाभार्थी (६४ हजार २६० रुपये), शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा जीसीसी-टीबीसी आर्थिक सहाय्य योजना ३४ लाभार्थी (१ लाख २३ हजार ५० रुपये), एमपीएससी-यूपीएससी आणि पीएच.डी अर्थसहाय्य योजना ३ लाभार्थी (१५ हजार रुपये), गुणवत्ता प्राप्त कामगार पाल्याचा सत्कार ६ लाभार्थी (३० हजार रुपये), असे एकूण ७१६५ लाभार्थ्यांना ३ कोटी १ लाख ५९ हजार ७४४ रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील लाभार्थी संख्या व त्यांना मिळालेली आर्थिक मदत पुढील प्रमाणे : गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजना १६३ लाभार्थी (३५ लाख १० हजार रुपये),साहित्य प्रकाशन अनुदान योजना १ लाभार्थी (१० हजार रुपये),सर्वसाधारण शैक्षणिक अर्थसहाय्य योजना ५६९४ लाभार्थी (१ कोटी ८० लाख ४४ हजार रुपये), क्रीडा अर्थसहाय्य योजना ७ लाभार्थी (३० हजार रुपये),परदेश शैक्षणिक अर्थसहाय्य योजना २८ लाभार्थी (१४ लाख रुपये),पाठ्यपुस्तक अर्थसहाय्य योजना ३४४ लाभार्थी (४ लाख ८६ हजार ९६० रुपये), एम.एस.सी.आय.टी. सहाय्यता योजना ५४८ लाभार्थी (१२ लाख ८२ हजार ३१४ रुपये), शिवणयंत्र अनुदान योजना १३ लाभार्थी (५९ हजार ६७० रुपये), शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा ऋछउ-ढइउ आर्थिक सहाय्य योजना

६९ लाभार्थी (२ लाख ९७ हजार रुपये), एमपीएससी- यूपीएससी आणि पीएच. डी अर्थसहाय्य योजना ५ लाभार्थी (२५ हजार रुपये), गुणवत्ता प्राप्त कामगार पाल्याचा सत्कार १३ लाभार्थी (६५ हजार रुपये), वाहन चालक अर्थसहाय्य योजना ९० लाभार्थी (४ लाख ४२ हजार ११० रुपये), अशा एकूण ६९७४ लाभार्थ्यांना २ कोटी ५६ लाख ५२ हजार ५४ रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

नागवडे कारखान्याने ३७०० रुपयांचा पहिला हप्ता द्यावा; अन्यथा गव्हाण बंद!

ऊस उत्पादकांचा २ डिसेंबरपासून आंदोलनाचा इशारा; ओंकार ग्रुपचा दरही अमान्य, ४ हजारांची मागणी

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

चालू गळीत हंगाम सुरू होऊन दोन महिने उलटले तरी नागवडे सहकारी साखर कारखान्याने ऊसदर जाहीर केलेला नाही. आतापर्यंत सुमारे तीन लाख मेट्रिक टन उसाचे गाळप होऊनही शेतकऱ्यांना ऊसबिलाचा छदाम मिळालेला नसल्याने ऊस उत्पादक संतप्त झाले आहेत. कारखान्याने प्रतिटन ३ हजार ७०० रुपयांचा पहिला हप्ता १ डिसेंबरपूर्वी अदा करावा, अन्यथा २ डिसेंबरपासून रास्ता रोको व गव्हाण बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तालुकाध्यक्ष हरिदास शिर्के, शामराव नागवडे यांच्यासह शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

पुणे, सोलापूर आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक कारखान्यांनी ऊसदर जाहीर करून पहिला हप्ताही दिला आहे. मात्र नागवडे कारखान्याचे व्यवस्थापन शेतकऱ्यांना दराबाबत अंधारात ठेवत असल्याचा आरोप शिर्के यांनी केला. जिल्हा बँकेच्या साखरेवरील उचल धोरणाचा विचार करून नागवडे कारखान्याने प्रतिटन ४ हजार रुपये दर जाहीर करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

मंगळवारी हिरडगाव येथील गौरी शुगर आणि देवदैठण येथील ओंकार शुगर या ओंकार ग्रुपच्या कारखान्यांनी जाहीर केलेला ३७०० रुपयांचा दरही शेतकऱ्यांना मान्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. ओंकार ग्रुपनेही प्रतिटन ४ हजार रुपये दर जाहीर करून ३७०० रुपयांचा पहिला हप्ता द्यावा, अन्यथा आंदोलनाला सामोरे जावे, असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सहकारमंत्री, पालकमंत्री आणि साखर आयुक्तांना पाठविण्यात आल्या आहेत. निवेदनावर हरिदास शिर्के, शामराव नागवडे, योगेश मगर, नितीन जिजाबापू शिंदे, बाबासाहेब चोरमले, नितीन वाबळे व बाळासाहेब जाधव यांच्या सह्या आहेत.

महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा वेशीवरील पुतळा परिसरात मंडप उभारावा; क्रांतीज्योती सावित्रीबाई-महात्मा ज्योतिराव फुले कृती समितीचे आयुक्तांना निवेदन

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**



थोर समाजसुधारक, सत्यशोधक विचारांचे प्रणेते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६ रोजी माळीवाडा वेस येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी महानगरपालिकेने आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी क्रांतीज्योती सावित्रीबाई-महात्मा ज्योतिराव फुले कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते, पंडित खरपुडे आणि ऋषिकेश चव्हाण यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

महात्मा ज्योतिबा फुले यांची २८ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी असून, या दिवशी शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांतील मान्यवर, कार्यकर्ते तसेच नागरिक माळीवाडा वेशीवरील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतात. त्यामुळे या ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने पुतळा परिसराची स्वच्छता करून तेथे मंडप उभारावा, तसेच अभिवादन कार्यक्रमासाठी माईक व ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी, अशी मागणी समितीने निवेदनातून केली आहे.

महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते व महानगरपालिकेच्या वतीनेही अधिकृतरीत्या पुष्पहार अर्पण करून महात्मा फुले यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात यावे, अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली आहे. महात्मा फुले यांनी समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर संघर्ष केला. स्त्रीशिक्षण, सामाजिक समता, जातिभेद निर्मूलन आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या विचारांचा जागर आणि कार्याचे स्मरण करण्यासाठी पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमाला विशेष महत्त्व असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पुण्यतिथीच्या दिवशी शहरातील अनेक मान्यवर, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी येणार आहेत. त्यामुळे कार्यक्रमस्थळी गैरसोय होऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाने वेळेत नियोजन करणे आवश्यक आहे. पुतळा परिसर स्वच्छ व सुशोभित करणे, मंडप उभारणे आणि माईक व्यवस्था उपलब्ध करून देणे या मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, असे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

दुष्काळाच्या लढ्यात साहित्यिकांनी उतरावे; पशुधन वाचविण्यासाठी सज्ज व्हा!

माधवराव लामखडे । निमगाव वाघा येथे नववे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

सध्याची दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस तीव्र होत असून, अशा संकटाच्या काळात साहित्यिक आणि कवींनी समाजजागृतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून दुष्काळाच्या लढ्यात योगदान द्यावे. पशुधन जगले पाहिजे, यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज भासणार आहे. आगामी दोन महिन्यांनंतर दुष्काळाची तीव्रता अधिक प्रकर्षाने जाणवणार असून, वन्यप्राणी आणि जनावरांसाठी पाणी व चाऱ्याची व्यवस्था करण्यासाठी आतापासूनच सज्ज राहावे, असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे यांनी केले.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे नववे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी माधवराव लामखडे बोलत होते. यावेळी स्वागताध्यक्ष ॲड. राजेश कावरे, कवी संमेलनाच्या अध्यक्षा प्रा. अश्विनी काळे (पुणे), कार्यक्रमाचे संयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, वक्ते अमोद नलगे, साहित्यिक व कवयित्री सरोज आल्हाट, भागवताचार्य रत्नप्रभा काळे, ह.भ.प. दिपाली गणगे (कोकाटे), माजी सरपंच साहेबराव बोडखे, भाऊसाहेब ठाणगे, लक्ष्मण चौरे, काँग्रेसचे नगर तालुकाध्यक्ष भरत बोडखे यांच्यासह साहित्यिक, कवी, शाहीर आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लामखडे पुढे म्हणाले की, दुष्काळ आणि त्यावरील उपाययोजना या विषयावर आयोजित करण्यात आलेली काव्यलेखन स्पर्धा कौतुकास्पद आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून निर्माण झालेल्या



कविता आणि साहित्य समाजामध्ये जागृती घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतील. दुष्काळाच्या संकटाचा सामना करण्यासाठी केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता प्रत्येकाने आपापल्या परीने योगदान देणे आवश्यक आहे. विशेषतः पशुधन आणि वन्यप्राण्यांच्या पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वीच त्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

स्वागताध्यक्ष ॲड. राजेश कावरे म्हणाले की, साहित्य हे समाजाचा आरसा आहे. समाजातील वेदना, आनंद, संघर्ष, परिवर्तन, संस्कार आणि माणुसकीचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटत असते. समाजाला योग्य दिशा देण्यासाठी अशा साहित्य संमेलनांची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील साहित्यिकांना आपले विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

कवी संमेलनाच्या अध्यक्षा प्रा. अश्विनी काळे म्हणाल्या की, डिजिटल युगात मोबाईल, ई-पुस्तके, विविध डिजिटल माध्यमे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातूनही वाचन संस्कृती बहरली पाहिजे. साहित्य आणि काव्य ही केवळ मनोरंजनाची साधने नसून समाजाला दिशा देणारे विचार आहेत. त्यामुळे नव्या पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी साहित्यिकांची मोठी जबाबदारी आहे. बदलत्या काळानुसार वाचनाची माध्यमे बदलत असली तरी वाचनाचे महत्त्व कायम राहिले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

संमेलनात नेवासा येथील प्रसिद्ध शिवशाहीर सुनील चिंचोलीकर यांच्या पोवाड्याचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आयोजित काव्यलेखन स्पर्धेत संदिप रासकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. बाळासाहेब देशमुख यांनी द्वितीय, तर रुपचंद शिदोरे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. धोफ्लडीराम खांडेकर यांची कविता उत्तेजनार्थ ठरली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिकप्राप्त कवींना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

संमेलनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये प्राचार्या अनुरिता झगडे, मुख्याध्यापिका संगिता रासकर, माधुरी नष्टे, डॉ. मंगल बोराडे, शेख चांद हुसेन, रेवती कुलकर्णी, लक्ष्मी जाधव, दिपाली अंधारे, संगिता आतकर, कु. दिव्या पवार, रेश्मा पवार, भारती पाचारणे आणि अनन्या दरेकर यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी गोकुळ जाधव, उद्योजक दिलावर शेख, भागचंद जाधव, अण्णा जाधव, भाऊसाहेब जाधव, सागर कापसे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदिप रासकर यांनी केले, तर आभार संदिप डोंगरे यांनी मानले.

वीरभूमी

जिल्हा उपनिबंधकांच्या कारभाराविरोधात कास्ट्राईब महासंघाचे ढोल-ताशांच्या गजरात निदर्शने

खोट्या तक्रारींच्या आधारे कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास दिल्याचा आरोप । तक्रारी व चौकशीच्या प्रतींची केली होळी!

● अहिल्यानगर । वीरभूमी–

माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळवून सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात कथित खोटे तक्रार अर्ज दाखल करणे आणि त्या अर्जांच्या आधारे कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देण्यासाठी खातेनिहाय चौकशा लावण्याच्या प्रकाराचा महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब महासंघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या निषेधार्थ शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मागील बाजूस असलेल्या जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर ढोल-ताशांच्या गजरात जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी संतप्त आंदोलकांनी खोट्या तक्रारी आणि चौकशीच्या प्रतींची होळी करून प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदविला.

या आंदोलनात महासंघाचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे, वसंत थोरात, के. के. जाधव, सुहास धीवर, ना. म. साठे, भाऊसाहेब सिनारे, अश्विनी खरपुडे, ज्योती हराळे, सुरेश बनसोडे, डॅनियल पारधे, भारती रोहकले यांच्यासह सहकार विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते.

कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण देणे, त्यांना सुरक्षित वातावरणात काम करता यावे यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, हे संबंधित कार्यालयप्रमुखांचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र, कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याऐवजी जिल्हा उपनिबंधकांकडून त्यांच्याच विरोधात खातेनिहाय चौकशा लावल्या जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. तसेच विविध तक्रार अर्जांच्या आधारे कर्मचाऱ्यांकडून लेखी खुलासे मागविणे, जबाब नोंदविणे आणि प्रशासकीय प्रक्रियांचा वापर करून त्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

या प्रकारामुळे कर्मचाऱ्यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज करताना मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे. कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून कार्यालयातील कामकाजाचे वातावरणही अस्वस्थ बनले आहे. महासंघाने प्रशासनासमोर विविध बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या कथित त्रासाला आळा घालण्याऐवजी कर्मचाऱ्यांनाच चौकशीच्या प्रक्रियेत अडकविले जात असल्याने महासंघाने नाराजी व्यक्त केली.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासासंदर्भात पोलीस खात्याकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. या तक्रारींची माहिती जिल्हा उपनिबंधकांना देऊन संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस संरक्षण मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणीही करण्यात आली होती. यासंदर्भात महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा उपनिबंधकांशी प्रत्यक्ष चर्चा केली होती. मात्र, वारंवार मागणी करूनही या प्रकरणात अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झाल्याचे महासंघाला कळविण्यात आलेले नाही. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे कर्मचाऱ्यांमधील नाराजी अधिक तीव्र झाल्याचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे यांनी सांगितले.



या आंदोलनाच्या माध्यमातून अर्जांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना त्रास देण्याचे प्रकार त्वरित थांबवावेत, मागण्या मांडल्या. अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात नियमबाह्य पद्धतीने सुरू करण्यात आलेल्या खातेनिहाय चौकशा तातडीने रद्द कराव्यात, चुकीची माहिती देऊन अथवा तक्रार तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस खात्यामार्फत आवश्यक संरक्षण मिळवून द्यावे, अशा मागण्या करण्यात आल्या.

सहाय्यक सहकारी अधिकारी डी. पी. खरपुडे यांनी २१ सप्टेंबर २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याची योग्य पद्धतीने चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. तसेच या प्रक्रियेत प्रशासनाने पूर्ण सहकार्य करावे, अशी मागणीही महासंघाने केली आहे.

ढवळपुरीतील सतलोक आश्रमात रक्तदानाचा महायज्ञ; १५३ रक्तपिशव्यांचे संकलन

संत रामपालजी महाराज यांच्या ५१३ व्या दिव्य धर्म यज्ञ दिनानिमित्त शिबिर

● अहिल्यानगर । वीरभूमी–



ढवळपुरी (ता. पारनेर) येथील सतलोक आश्रमात संत रामपालजी महाराज यांच्या ५१३ व्या दिव्य धर्म यज्ञ दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अध्यात्मासोबत सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात भाविकांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.

न्यू अर्पण रक्तपेढी यांच्या सहकार्याने झालेल्या शिबिरात १५३ रक्तपिशव्या संकलित झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

न्यू अर्पण रक्तपेढीच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले की, दीपावलीनंतर अहिल्यानगर जिल्ह्यात रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला होता. हा तुटवडा भरून काढण्यासाठी अशा रक्तदान शिबिरांची मोठी मदत होते. न्यू अर्पण रक्तपेढी यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या शिबिराचा जिल्ह्यातील गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मदत होईल.

दिल्ली येथून आलेले भाविक अलकेश यांनी सांगितले की, संत रामपालजी महाराज यांच्या दिव्य धर्म यज्ञ दिनानिमित्त देशातील विविध आश्रमांमध्ये एकाच वेळी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह संपूर्ण देशातून भाविक या कार्यक्रमासाठी येतात. वर्षातून सहा वेळा तीन दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या काळात भाविकांसाठी निवास, भोजन आणि वाहतुकीची मोफत व्यवस्था केली जाते. अन्नपूर्णा मोहिमेच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना अन्न, वस्त्र आणि निवारा उपलब्ध करून देण्यासह अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी तसेच गरजू रुग्णांच्या मोफत उपचारांसाठी सहकार्य केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यांचा सतलोक आश्रम धनाना धाम, हरियाणा येथे असल्याचेही त्यांनी सांगितले.

नाशिक येथून आलेले आश्रम सेवादार रमेशदास केकान यांनी सांगितले की, देशभरातील साधारणतः १५ ते १७ आश्रमांमध्ये एकाच वेळी ५१३ वा दिव्य धर्म यज्ञ दिवस साजरा केला जात आहे. या सर्व ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. रक्त कृत्रिमरीत्या तयार करता येत नसल्याने रक्तदानाचे महत्त्व मोठे आहे. संकलित केलेले रक्त रक्तपेढ्यांच्या माध्यमातून गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविले जाते. वर्षातून सहा वेळा होणाऱ्या धार्मिक समागमांमध्ये रक्तदान, देहदान, वैद्यकीय शिबिरे, ज्ञानचर्चा आणि भंडाऱ्याचे आयोजन केले जाते. या उपक्रमांमध्ये गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मदत केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ढवळपुरी येथे १५३ युनिट रक्त संकलित झाल्याचे त्यांनी सांगितले. रक्तदानासोबत देहदानाचाही उपक्रम राबविला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

दिव्यांगांच्या हक्कांसाठी विळदघाट येथे आज विशेष कार्यशाळा

कायदेशीर पालकत्व आणि 'निरामय' आरोग्य विमा योजनेबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन

● अहिल्यानगर । वीरभूमी–

दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव व्हावी, त्यांना आरोग्य सुरक्षेचे कवच मिळावे आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचालित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळदघाट यांच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (डीडीआरसी), विळदघाट येथे ही कार्यशाळा होणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. मात्र, योजनांची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज करण्याची पद्धत आणि प्रशासकीय प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्याने अनेक पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. विशेषतः ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांपर्यंत या योजनांची माहिती पोहोचविणे, त्यांच्यामध्ये जनजागृती निर्माण करणे आणि योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.



या कार्यशाळेत 'दिव्यांगांसाठी सर्वकाही' या पुस्तकाचे लेखक तथा महाराष्ट्र राज्य दिव्यांग आर्थिक विकास महामंडळ, मुंबईचे सेवानिवृत्त महाव्यवस्थापक नंदकुमार फुले हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाच्या आधारे ते दिव्यांग व्यक्तींचे कायदेशीर हक्क, पालकत्वासंबंधी कायदेशीर तरतुदी, आरोग्य विमा योजना आणि त्यासंबंधित प्रक्रियांविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

दिव्यांग व्यक्तींच्या पालकांसमोर त्यांच्या पश्चात पाल्याची काळजी कोण घेणार, त्याच्या आर्थिक व कायदेशीर हितांचे संरक्षण कसे होणार आणि आवश्यक निर्णय घेण्यासाठी त्याला योग्य सहाय्य कसे उपलब्ध होणार, असे अनेक प्रश्न असतात. राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ आणि दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ यांमधील तरतुदींच्या अनुषंगाने कायदेशीर पालकत्व तसेच निर्णयप्रक्रियेसाठी आवश्यक सहाय्याबाबत कार्यशाळेत माहिती दिली जाणार आहे.

कायदेशीर पालकत्वाची आवश्यकता कोणत्या परिस्थितीत भासते, त्यासाठी अर्ज कसा करावा, स्थानिक स्तर समितीची भूमिका काय असते, कोणती कागदपत्रे आवश्यक असतात आणि कायदेशीर पालकाच्या जबाबदाऱ्या कोणत्या, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. या प्रक्रियेत दिव्यांग व्यक्तीची इच्छा, स्वायत्तता, प्रतिष्ठा, गोपनीयता आणि कायदेशीर हक्कांचा सन्मान राखण्याचे महत्त्वही अधोरेखित केले जाणार आहे.

याशिवाय, राष्ट्रीय न्यासामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'निरामय' आरोग्य विमा योजनेची माहितीही या कार्यशाळेत दिली जाणार आहे. स्वमग्नता (ऑटिझम), प्रमस्तिष्क पक्षाघात, बौद्धिक दिव्यांगत्व आणि बहुविकलांगता असलेल्या पात्र व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येतो. योजनेच्या प्रचलित अटी व नियमांनुसार पात्र लाभार्थ्यांना एक लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण उपलब्ध होऊ शकते.

या विमा संरक्षणामध्ये निर्धारित मर्यादेनुसार रुग्णालयातील उपचार, औषधे, वैद्यकीय तपासण्या, पात्र शस्त्रक्रिया, दंत आरोग्य सेवा, नियमित उपचारात्मक थेरपी, आयुष उपचार आणि वाहतूक खर्चाचा समावेश आहे. विमा लाभ खर्च प्रतिपूर्ती पद्धतीने दिले जातात. योजनेसाठी आवश्यक पात्रता, नोंदणी, नूतनीकरण, कागदपत्रांची पूर्तता आणि विमा दावा सादर करण्याची प्रक्रिया याबाबतही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूतीची नव्हे, तर समान संधी, आरोग्य सुरक्षा, आवश्यक सहाय्य आणि त्यांच्या हक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज आहे. शासनाच्या कल्याणकारी योजना आणि पात्र लाभार्थी यांच्यातील माहितीची दरी कमी करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक आहे. संविधान दिनाच्या औचित्याने आयोजित ही कार्यशाळा समानता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठा या संविधानिक मूल्यांच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

दिव्यांग व्यक्ती, त्यांचे पालक, काळजीवाहक, विशेष शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत संस्था तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील गरजू कुटुंबीयांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

मंदिर समाजसेवेचे केंद्र बनविण्याचा वरद विनायक देवस्थानचा संकल्प कौतुकास्पद

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । श्री वरद विनायक देवस्थानला भेट देऊन दर्शन व आरती; सेवाभावी उपक्रमांचे केले कौतुक

● अकोले । वीरभूमी–

महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कोतूळ येथील श्री वरद विनायक देवस्थानला भेट देऊन श्री वरद विनायकाचे दर्शन घेतले. त्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. देवस्थानच्या वतीने श्री विनय समुद्र यांनी पालकमंत्री विखे पाटील यांचा सन्मान केला.

यावेळी देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप श्रीधर भाटे यांनी देवस्थानच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या धार्मिक, सामाजिक, आरोग्यविषयक व सेवाभावी उपक्रमांची माहिती दिली. मंदिर हे केवळ श्रद्धा आणि भक्तीचे केंद्र न राहता संस्कार, समाजजागृती, आरोग्यसेवा व समाजहिताचे केंद्र बनावे, या संकल्पनेतून देवस्थानच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

गरीब, गरजू व वंचित रुग्णांसाठी रुग्णोपयोगी साहित्य भांडार सुरू करणे, मोफत सर्वरोग निदान व उपचार महाआरोग्य शिबिर आयोजित करणे, तसेच समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देणे, या उपक्रमांचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष कौतुक केले. मंदिराच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचविण्याचा देवस्थानचा प्रयत्न प्रेरणादायी असून, मंदिर समाजसेवेचे केंद्र बनविण्याचा हा संकल्प निश्चितच अभिनंदनीय असल्याचे त्यांनी गौरवोद्गार काढले.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर, प्रांतमंत्री किशोर चव्हाण, माजी आमदार वैभव पिचड, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सिताराम पाटील गायकर, पतित पावन संघटनेचे प्रांताध्यक्ष प्रा. सोपानराव देशमुख, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख शिवाजी धुमाळ, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सिताराम देशमुख, माजी प्रशासकीय अधिकारी बी. जे. देशमुख, माजी उपसरपंच राजेंद्र देशमुख, डॉ सुभाष सोमण, सुनील गिते, डॉ. सतिष वाळुंज, डॉ. कपिल कातोरे,कुलदीप नेवासकर, सचिन पाटील, प्रणव परशुरामी,संभाजी पोखरकर, अजित आरोटे यांच्यासह अनेक मान्यवर व गणेशभक्त उपस्थित होते.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या देवस्थान भेटीमुळे श्री वरद विनायक देवस्थानच्या सेवाभावी कार्याला प्रोत्साहन मिळाले असून, धार्मिक कार्यासोबतच समाजहिताचे उपक्रम अधिक व्यापक करण्यासाठी प्रेरणा मिळाली.